# शहादा येथे तापमानवाढीबाबत

# ५० विद्यार्थ्यांचे शोधनिबंध सादर




■ शहादा विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात आयोजित चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी संस्थाध्यक्ष मोतीलाल पाटील, प्राचार्य एल.एन.चौधरी, डॉ.आर.डी.पाटील, डॉ.निळे, प्रा.बागूल, प्रा.भूषण निकम.

नंदुरबार, दि.१५- शहादा येथील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात तापमानवाढ जाणीव व जागृती या विषयावरील चर्चासत्र नुकतेच झाले.

त्यात जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांमधील ५० विद्यार्थ्यांनी शोधनिबंध सादर केले. यात तापमान रोखण्यासंदर्भात आवाहन करणारी भित्तीपत्रके सादर करण्यात आली. त्यातून ४४ विद्यार्थ्यांनी जागतिक तापमानवाढीच्या समस्येविषयी माहिती दिली होती. भित्तीपत्रकांचे परीक्षण प्रा.जी.बी.शेळके, यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे डॉ.निळे, प्रा.बागूल यांनी केले. दोन टप्प्यात चर्चासत्र झाले. पहिल्या सत्रात उद्घाटन कार्यक्रम झाला. उद्घाटन शहादा तालुका एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन मोतीलाल पाटील यांच्याहस्ते झाले. एसएनडीटी

■ **विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात तापमान वाढीवर चर्चासत्र**

■ **जिल्हाभरातील महाविद्यालयांचा सहभाग**

■ **विजेत्यांना बक्षिसे**


महाविद्यालयाचे प्राचार्य एल.एन.चौधरी यांनी केले. चर्चासत्रात प्रा.शेळके, डॉ.यु.व्ही.निळे, डॉ.एस.पी.गिरासे, प्रा.बी.वाय.बागूल, डॉ.आर.डी.पाटील, प्रा.ए.के.पटेल, पी.एल.ठाकरे यांनी सहभाग घेतला. डॉ.निळे यांनी दुसऱ्या सत्रात मार्गदर्शन केले. समारोपप्रसंगी संस्थेचे सचिव डॉ.विलास पटेल अध्यक्षस्थानी होते. विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा.ए.के.पटेल यांनी आभार मानले.

या उपक्रमात आयएमआरडी विभागाची विद्यार्थिनी निकिता राखेचा प्रथम, समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थी सचिन बोरसे द्वितीय व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाची विद्यार्थिनी पूजा राजेंद्र साळी व वृषाली चौधरी यांना संयुक्तपणे तृतीय क्रमांक मिळाला. कार्यक्रम अधिकारी प्रा.भूषण निकम होते. प्रा.तावडे यांनी सूत्रसंचालन केले. चर्चासत्रात यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्याहस्ते विविध बक्षिसे देण्यात आली.

लोकमत

## 'सामाजिक बदलासाठी गांधीजींचे विचार'

# चर्चासत्रात ३६ शोधनिबंध सादर



■ शहादा येथील वरिष्ठ विज्ञान महाविद्यालयात आयोजित चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित विकास संस्थेचे चेअरमन मोतीलाल पाटील, चरणभाई देसाई, डॉ.पीतांबर सरोदे, डी.एच.पाटील, प्राचार्य एल.एन.चौधरी, प्रा.ए.के.पटेल, प्रा.भूषण निकम.

**नंदुरबार, दि.२४-** शहादा येथील शहादा तालुका को.ऑपरेटिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात एनएसएस विभाग, सर्वोदय आश्रम, सर्वोदय मंडळ, मुंबई, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने 'सामाजिक बदलासाठी गांधीजींचे विचार' या विषयावर दोन दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. त्यात जिल्ह्यातील सुमारे ३६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन आपले शोधनिबंध सादर केले.

उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ.आर.डी. पाटील, एसएनडीटी महिला महाविद्यालयाचे प्राचार्य एल.एन.चौधरी, आय.एम.आर.डी. विभागाचे संचालक डॉ.एस.पी.गिरासे, डॉ.पीतांबर सरोदे, प्रा.ए.के.पटेल, प्रा.भूषण निकम आदी उपस्थित होते. पहिल्या सत्रात चरणभाई देसाई वक्ते होते. दुसऱ्या सत्रात अध्यक्षस्थानी जयदेव पाटील होते. प्रा.डॉ.पीतांबर सरोदे वक्ते होते. प्रा. तावडे यांनी त्या सत्राचे सूत्रसंचालन केले. तिसऱ्या सत्राच्या अध्यक्षस्थानी उमविच्या विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक प्रा.विलास चव्हाण होते. प्राचार्य बी.डी.पाटील यांनी त्यात मनोगत व्यक्त केले. प्रा.निकम यांनी त्या सत्राचे सूत्रसंचालन केले. आभार प्रा.जितेंद्र पाटील यांनी मानले. चौथ्या सत्रात अध्यक्षस्थानी डॉ.विलास पाटील व वक्ते डी.एच.पटेल, प्राचार्य एल.एन.चौधरी होते. शोधनिबंधाच्या निष्कर्षासाठी डॉ.एस.पी. गिरासे यांनी काम पाहिले. प्रा.ए.के.पटेल यांनी आभार मानले. प्राचार्य डॉ.आर.डी.पाटील, संस्थेचे सचिव विलास पाटील यांच्या हस्ते सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

25 जाने 2011

सकाळ २९ डिसेंबर बुधवार

# शहाद्यात उद्या गांधी विचारविषयक चर्चासत्र

शहादा, ता. २८ : शहादा तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित येथील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात ३० व ३१ डिसेंबरला सामाजिक बदलांसाठी गांधीजींचे विचार या विषयावर चर्चासत्र होईल. राष्ट्रीय सेवा योजना, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, सर्वोदय आश्रम, सर्वोदय मंडळ व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयातर्फे हा कार्यक्रम होईल. जिल्ह्यातील महाविद्यालयांतून राष्ट्रीय सेवा योजनेतील दोन स्वयंसेवक यात एक विद्यार्थी व एक विद्यार्थिनी सहभागी होईल. संबंधितांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन सेवा योजनेचे कार्यक्रम समन्वयक प्रा. विलास चव्हाण यांनी केले. संबंधित लिखित साहित्य तीन प्रतींत चर्चासत्रापूर्वी सादर करावे. अधिक माहितीसाठी प्राचार्य आर. डी. पाटील, प्रा. भूषण निकम यांच्याशी (९३७०२१८५०१, ९८५००३६४६२) संपर्क साधावा. प्रा. एल. एन. चौधरी, प्रा. ए. के. पटेल आदी संयोजन करीत आहेत.

# श.ता. को.ऑप विज्ञान महाविद्यालयात आपत्कालीन व्यवस्थापन कार्यशाळा

शहादा दि.१९ (का.प्र.): येथील श.ता.को.ऑप एज्यु सोसायटी संचलित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात दि. २८ फेब्रुवारी ते २ मार्च या कालावधीत विद्यापीठस्तरीय आपत्कालीन व्यवस्थापन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यासाठी नंदुरबार, धुळे व जळगांव जिल्ह्यातील एकूण ११० महाविद्यालयातील सुमारे ३०० ते ४०० विद्यार्थी सहभागी होतील.

कार्यशाळेसाठी सहभागी विद्यार्थी हा शैक्षणिक वर्ष २०१३-१४ ह्या कालावधीत शिक्षण घेत असावा अशा प्रकारची पात्रता ठेवण्यात आली आहे. सदर कार्यशाळेत महाविद्यालयीन युवकांची समाजाप्रती भुमिका व निरनिराळ्या समस्यांमध्ये अथवा संकट काळामध्ये निर्णय क्षमता वाढीला लागणे ही गरज लक्षात घेवून निसर्ग निर्मित संकटांना जसे पूर, आग लागणे, भुकंप तसेच मानव निर्मित दंगली, युध्द या सारख्या आणिबाजीच्या प्रसंगी जिवीत व वित्तहानी **(पान ८ वर)**

आपला महाराष्ट्र २० फेब्रु २०१४
(गुरुवार)


## आपत्कालीन व्यवस्थापन कार्यशाळा

पासून संरक्षणासाठी व सकारात्मक कर्तव्याची भावना वाढीस लागण्यासाठी युवकांचा सहभाग महत्त्वपुर्ण असल्याने सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी आपात्कालीन विभाग जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार, नगरपालिका शहादा, तहसिल कार्यालय शहादा यांची मदत घेण्यात येणार आहे. तसेच तज्ज्ञ मंडळीचे मार्गदर्शन व विविध आपत्कालीन प्रसंगाचे प्रात्याक्षिके सादर केली जाणार आहेत. डॉ. पंकजकुमार नन्नावरे समन्वयक उमवि जळगांव यांचे मार्गदर्शनात कामकाज सुरु असून त्यासाठी शिबीर समन्वयक प्रा. भुषण निकम व विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. सचिन पाटील, शिबीर संयोजकांची जबाबदारी पुर्ण करीत आहे. त्यास संस्थेचे चेअरमन मोतीलाल पाटील, प्राचार्य डॉ. आर. डी. पाटील, प्रा. ए. के. पटेल यांचे मार्गदर्शन मिळत आहे.

सकाळ ७ डिसेंबर मंगळवार २०१०

# जागतिक तापमान वाढीवर शहाद्यात नऊला चर्चासत्र

## पन्नास विद्यार्थी करणार शोधनिबंधांचे सादरीकरण



**सकाळ वृत्तसेवा**

शहादा, ता. ६ : येथील शहादा तालुका को-ऑप. एज्युकेशन सोसायटी संचलित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात नऊ डिसेंबरला उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागातर्फे जागतिक तापमान वाढीचे पर्यावरणावर होत असलेले परिणाम या विषयावर चर्चासत्र होणार आहे. या चर्चासत्रात ५० विद्यार्थी शोधनिबंध सादर करणार आहेत.

संस्थेचे अध्यक्ष मोतीलाल पाटील यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्‌घाटन होईल. चाळीसगाव येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे प्रा. जी. बी. शेळके प्रमुख वक्ते असतील. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाचे अधिकारी प्रा. विलास चव्हाण, शहादा येथील 'आयएमआरडी' विभागाचे प्राचार्य डॉ. एस. पी. गिरासे प्रमुख पाहुणे असतील. चर्चासत्रात जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांचा समावेश आहे. त्यात सहभागी विद्यार्थ्यांना शोधनिबंध सादर करावयाचा असून, जागतिक तापमानाशी संबंधित भित्तिपत्रके मांडावयाचीआहेत. चर्चासत्रासाठी ५० विद्यार्थ्यांना सहभागी करून घेतले जाणार आहे. तसेच चर्चासत्रात विषयतज्ज्ञही मार्गदर्शन करतील. या गंभीर समस्येचे निराकरण होण्यासाठी चर्चासत्र फलदायी ठरेल, अशा प्रकारचा आशावाद चर्चिला जात असून या चर्चासत्राकडे काळाची गरज समजून पाहावे व चर्चासत्र यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांच्या सहभागासाठी महाविद्यालयांनी प्रयत्न करावेत. आठ डिसेंबरपर्यंत विद्यार्थ्यांनी शोधनिबंधांच्या लिखित स्वरूपात किमान तीन मिनिटे वाचता येतील, अशा दोन प्रती कार्यक्रम अधिकारी प्रा. भूषण निकम यांच्याकडे जमा कराव्यात, असे आवाहन महाविद्यालयाने केले आहे. एसएनडीटी महाविद्यालयाचे प्राचार्य एल. एन. चौधरी, विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. डी. पाटील, प्रा. ए. के. पटेल चर्चासत्राचे संयोजन करीत असून, चर्चासत्राच्या अधिक माहितीसाठी प्रा. भूषण निकम (९८५००३६४६२) यांच्याशी संपर्क साधावा.

# शहादा महाविद्यालयात गुरूवारी चर्चासत्राचे आयोजन

शहादा : येथील श.ता.को.ऑप.एज्यु.सोसा.संचलित, विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात दि. ९ डिसेंबर रोजी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ संलग्नित विद्यार्थी कल्याण विभागाअंतर्गत जागतिक तापमान वाढीचे पर्यावरणावर होत असलेले परिणाम ह्या ज्वलंत समस्येवर चर्चासत्र आयोजित करण्यात येत आहे. या चर्चासत्रात नंदुरबार जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयाचा समावेश असून त्यामध्ये सहभागी विद्यार्थ्यांना शोधनिबंध सादर करावयाचा असून जागतिक तामपमानाशी संबंधी भित्तीपत्रक सादर करण्याचे आवाहन महाविद्यालयाचे वतीने करावयास सांगितले आहे. सदर चर्चासत्रासाठी एकूण ५० विद्यार्थ्यांना सहभाग दिला जाणार आहे. त्याचप्रमाणे चर्चासत्रासाठी विषय तज्ज्ञाचेही मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. अशा ह्या गंभीर समस्येचे निराकरण होणे साठी चर्चासत्र फलदायीच ठरेल अशा प्रकारचा आशावाद चर्चिला जात असून ह्या चर्चासत्राकडे काळाची गरज समजून पहावे चर्चासत्र यशस्वी होण्यासाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांच्या सहभागासाठी महाविद्यालयानी प्रयत्न करावेत असे सुचित केले आहे.




■ शहादा येथील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात दोनदिवसीय चर्चासत्रात पूजन करताना प्रा.विलास चव्हाण. सोबत प्राचार्य डॉ.आर.डी.पाटील, डॉ.एस.पी.गिरासे, व्याख्याते बी.डी.पाटील, प्रा.ए.के.पटेल, प्रा.भूषण निकम.

# सामाजिक बदलासाठी गांधीजींचे विचार

## शहादा विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात चर्चासत्रातील सूर

**शहादा, दि.१०-** सामाजिक बदलासाठी गांधीजींचे विचार प्रेरणादायी असल्याचे विचार वक्त्यांनी व्यक्त केले.

शहादा तालुका को-ऑप.एज्युकेशन सोसायटी संचलित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवायोजना, सर्वोदय आश्रम सर्वोदय मंडळ मुंबई, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्यातर्फे 'सामाजिक बदलासाठी गांधीजींचे विचार' या विषयावर चार सत्रांमध्ये चर्चासत्र घेण्यात आले.

जिजामाता महाविद्यालय, समाजकार्य महाविद्यालय, आय.एम.आर.डी. महाविद्यालय व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय या महाविद्यालयांमधून घेण्यात आलेल्या चर्चासत्रात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

प्रथम सत्रासाठी गांधी विचाराने प्रेरित झालेले चरणभाई देसाई हे व्याख्याते होते. संस्थाध्यक्ष मोतीलाल पाटील अध्यक्षस्थानी होते. एल.एन.चौधरी यांनी प्रास्ताविक केले. या वेळी विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाच प्राचार्य डॉ.आर.डी. पाटील, एस.एन.डी.टी. महिला महाविद्यालयाचे प्राचार्य एल.एन.चौधरी, आय.एम.आर.डी. विभागाचे संचालक डॉ.एस.पी.गिरासे, कार्यक्रम अधिकारी प्रा.भूषण निकम उपस्थित होते.

चर्चासत्राच्या दुसऱ्या सत्राच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष जयदेवभाई पाटील होते. प्रा.डॉ.पीतांबर सरोदे प्रमुख व्याख्याते होते. त्यांनी गांधीजींच्या अहिंसावादी प्रणालीतून कशाप्रकारे सामाजिक बदल घडण्यास मदत झाली याबाबत मनोगत व्यक्त केले. प्रा.तावडे यांनी या सत्रादरम्यान सूत्रसंचालन केले.

तिसऱ्या चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक प्रा.विलास चव्हाण होते. शेठ व्ही.के. शहा महाविद्यालयाचे माजी प्राचार्य बी.डी. पाटील यांनी गांधी तत्त्वज्ञानाबद्दल मनोगत व्यक्त केले. प्रा.जितेंद्र पाटील यांनी आभार मानले. अध्यक्षीय मनोगतातून प्रा.विलास चव्हाण यांनी गांधीजी एक सामान्य माणूस होता व त्याचे रूपांतर महात्म्यात कसे झाले याचा इतिहास उलगडून दाखविला.

चर्चासत्राच्या चौथ्या सत्राच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव डॉ.विलासभाई पटेल होते. प्रमुख व्याख्याते ज्येष्ठ गांधीवादी डी.एच.पाटील व एस.एन.डी.टी. महिला महाविद्यालयाचे प्राचार्य एल.एन.चौधरी होते. गांधीजींनी सत्याचे प्रयोग या आत्मचरित्रात आपल्या जीवनातील वास्तव मांडून जगापुढे आदर्श ठेवला. त्याप्रमाणे आपणही आपल्या जीवनातील खऱ्या गोष्टी लिहून त्याचे मनन करणे गरजेचे आहे, असा उपदेश विद्यार्थ्यांना केला.

संस्थेचे सचिव विलासभाई पटेल यांनी गांधीजींच्या खरे बोलण्याच्या सवयीचा अंगीकार करून विद्यार्थ्यांना जीवन जगण्याची पंचसूत्री सांगितली.

प्रत्येक चर्चासत्रात विद्यार्थ्यांनी आपले शोधनिबंध सादर केले. यशस्वितेसाठी प्रा.पठाण, प्रा.तावडे, विनायक पाटील आदींनी सहकार्य केले.